भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

रु. 100

ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA

2022

12AA 453755

प्रतिज्ञापत्र कोणाकडे सादर करावयाचे – कार्यकारी दंडाधिकारीसो,हातकणंगले/-------------------- -

अन्य कारण - करार/बँक/पतसंस्था/हमीपत्र/कर्ज/फंड/ठिबक/वारस/संमत्ती/ -----------

मुद्रांक विकत घेणा-याचे नांव – किरण अशोक पोवार रा. आळते

ओळख नंबर - ....................

को.क्र. 23 / मु.वि.परवाना क्र.28/03 मुद्रांक नोंद वहि अनुक्रमांक – 306 मु. शु.रक्कम 100 पैकी 100

Sub Treasury Officer Hatkanangale

Sub Treasury Officer, Hatkanangale.

Dt. 10 AUG 2022

--------------------------------

मुद्रांक विकत घेणाऱ्यांची सही

अनिल विलास बनकर

मु.वि.हातकणंगले . 9881336234

दिनांक 24 / 08 / 2022

पुर्व सुचना - सदर मुद्रांक पक्षकार यांनी स्वजाबाबदारीवर घेतलेला आहे, त्याचा गैरवापर झाल्यास त्यास मुद्रांक विक्रेता जबाबदार राहणार नाहीत याची पुर्व कल्पना मुद्रांक विकत घेणार यांना दिलेली आहे याची नोंद घ्यावी.

मराठी विभाग

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,पेठवडगाव.**

ता : हातकणंगले, जि: कोल्हापूर

**आणि**

मराठी विभाग

**मा.श्री.अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,हातकणंगले.**

ता : हातकणंगले, जि: कोल्हापूर

## या महाविद्यालातील मराठी विभागाचा

## सामंजस्य करार

MEMORANDUM OF UNDERSTANDING (MOU)

१८ ऑगस्ट २०२२

मराठी विभाग

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,पेठवडगाव.

ता : हातकणंगले, जि: कोल्हापूर

**आणि**

मराठी विभाग

## मा.श्री.अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,हातकणंगले.

ता : हातकणंगले, जि: कोल्हापूर

## या महाविद्यालातील मराठी विभागाचा

## सामंजस्य करार

MEMORANDUM OF UNDERSTANDING (MOU)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठवडगाव. हे कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यात ग्रामीण विभागात आहे. हे महाविद्यालय शिवाजी विद्यापीठाशी सलग्न असून येथे कला, वाणिज्य व विज्ञान या शाखा आहेत. या महाविद्यालयाद्वारे सातत्याने साहित्यिक व सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात.

वर नमूद केलेल्या आपल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,पेठवडगाव. आणि मा.श्री.अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हातकणंगले. या महाविद्यालयांच्या मराठी विभागाचा एकमेकांबरोबर सामंजस्य करार दि.१८ ऑगस्ट २०२२ रोजी करत आहेत. सदर करारादवारे उभय संस्थांच्या सहयोगाने पूर्ण करावयाची खालील उद्दिष्ट्ये निर्धारित करण्यात आली आहेत.

उद्दिष्टये

१. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन करणे, तसेच विद्यार्थ्यांसाठी विविध विषयांवर संशोधन प्रकल्प राबविणे.
२. चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, काव्यसंमेलन, साहित्यसंमेलन, संयुक्त बैठका यांचे आयोजन करणे.
३. मराठी विषयाचे विद्यापीठीय अभ्यासक्रम, प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम यासाठी सहयोग व सहकार्य करणे.
४. विद्यार्थ्यांसाठी निबंध, वक्तृत्व, वादविवाद, प्रश्नमंजूषा, कथालेखन, काव्यलेखन, अभिवाचन, पुस्तक परीक्षण, काव्यवाचन, कथाकथन आदी स्पर्धांचे आयोजन करणे.
५. महाविद्यालयातील स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन केंद्राला मराठी भाषा व साहित्य या विषयाच्या तयारीसाठी सहकार्य करणे.
६. विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्व विकास प्रकल्प, भाषिक कौशल्ये विकास प्रकल्प राबविणे.
७. प्राध्यापक, विद्यार्थी, नवोदित लेखक यांच्यासाठी सर्जनशील लेखन, उपयोजितमराठी लेखन यासंबंधी प्रकल्प राबविणे.
८. महाविद्यालयात मोडीलिपी, मुद्रितशोधन, पत्रकारिता,८. व्यक्तिमत्व विकास व भाषिक कौशल्य इत्यादी अभ्यासक्रमांचे सर्टिफिकेट कोर्स चे आयोजन करणे.
९. प्राध्यापक व विद्यार्थी यांचे ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी सहकार्य करणे. ग्रंथाचा प्रकाशन समारंभ तसेच ग्रंथ चर्चा घडवून आणणे.